# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः01.07.2026** **वारःबुधवार**

---

1. विकसित भारत-रोजगार आणि उपजिविका हमी ग्रामीण कायदा आजपासून देशाच्या ग्रामीण भागात लागू होणार
2. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांच्यात दूरध्वनीवरून चर्चा
3. व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलेंडरच्या किंमतीत 183 रुपयांनी घट
4. ज्येष्ठ नाट्य दिग्दर्शिका विजया मेहता यांचं निधन आणि
5. भारत आणि इंग्लंड यांच्यातल्या पाच सामन्यांच्या टी ट्वेंटी क्रिकेट मालिकेला आजपासून सुरुवात

**<u>व्हीबी जीरामजी</u>**

रोजगाराची हमी देणारा विकसित भारत- रोजगार आणि उपजिविका हमी ग्रामीण कायदा 2025 म्हणजेच VB-G RAM G कायदा, आजपासून देशाच्या ग्रामीण भागात लागू होत आहे. प्रत्येक आर्थिक वर्षात 125 दिवसांच्या वेतनासह रोजगाराची हमी देणारा हा कायदा ग्रामीण भारताला सक्षम करेल, असा विश्वास ग्रामविकास मंत्रालयानं व्यक्त केला आहे. याच्या अंमलबजावणीसाठी यंदाच्या आर्थिक वर्षात 95 हजार 692 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. विहित मुदतीत काम न मिळाल्यास बेरोजगारी भत्ता देण्याची तरतूद नव्या कायद्यात आहे. हा कायदा जुन्या मनरेगा कायद्याची जागा घेणार आहे. पात्र कामगारांना दररोज रोजगार मिळवा, हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे, या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी केंद्र सरकारनं राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या समन्वयातून सर्व तयारी पूर्ण केली आहे, असं केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी म्हटलं आहे.

**<u>पंतप्रधान-सचिव बैठक</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल वेगवेगळ्या मंत्रालयांच्या सचिवांशी संवाद साधला. हा संवाद, मुख्यत्वे व्यवसाय सुलभता आणि जीवन सुलभतेसाठीच्या सुधारणा आणि आत्मनिर्भरतेला चालना देण्याच्या मुख्य विषयसूत्रांवर आधारित होता. संपूर्ण सरकार दृष्टीकोन आणि विविध विभागांदरम्यान समन्वयातील अडथळे दूर करण्यावर पंतप्रधानांनी या बैठकीत भर दिला. विभागांमधील परस्पर समन्वय आणि निर्णय प्रक्रियेसाठी पीएम गतिशक्ती या मंचाचा प्रभावी आणि व्यापक उपयोग करून घेण्याचं आवाहन पंतप्रधानांनी केलं.

**<u>मोदी इराण दूरध्वनी</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल इराणचे राष्ट्राध्यक्ष डॉक्टर मसूद पेझेश्कियान यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा केली. राष्ट्राध्यक्ष पेझेश्कियान यांनी पंतप्रधान मोदींना पश्चिम आशियातील अलीकडील घडामोडींची माहिती दिली. पश्चिम आशियामध्ये शांतता प्रस्थापित करण्यासाठी होत असलेल्या प्रयत्नाचं पंतप्रधानांनी स्वागत केलं. या संदर्भातील सर्व मुद्दे, संवाद आणि मुत्सद्देगिरीच्या माध्यमातून सोडवले जावेत, या भारताच्या भूमिकेचा मोदी यांनी पुनरुच्चार केला. पश्चिम आशियात शाश्वत शांतता आणि स्थैर्य तसंच सुरक्षित नौवहन आणि व्यापार सुनिश्चित करण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्नांची गरज असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**<u>जपान-पंतप्रधान</u>**

जपानच्या पंतप्रधान सानाई ताकाईची आजपासून तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येणार आहेत. ताकाईची यांची ही पहिलीच अधिकृत भेट असेल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह त्या उद्या 16व्या भारत-जपान वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होतील.

**<u>गोयल-ग्रीस चर्चा</u>**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल ग्रीसच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनी काल ग्रीसचे अर्थ मंत्री किरियाकोस पिएराकाकिस यांच्यासमवेत चर्चा केली. आर्थिक सेवा, फिनटेक, डिजिटल पेमेंट्स आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान या क्षेत्रांतील सहकार्य वाढवून भारत आणि ग्रीस यांच्यातील आर्थिक संबंध अधिक दृढ करण्याबाबत यावेळी चर्चा झाली.

**व्यावसायिक सिलेंडर**

व्यावसायिक वापरासाठीच्या एलपीजी सिलेंडरच्या किंमतीत घट झाली आहे. तेल कंपन्यांकडून 19 किलोग्रॅम वजनाच्या सिलेंडरच्या किंमतीत 183 रुपयांची दर कपात करण्यात आली आहे. ही दर कपात आजपासून लागू होईल.

**डॉक्टर-लेखापाल दिन**

आज देशभरात डॉक्टर्स दिन आणि सनदी लेखापाल दिवस साजरा होत आहे. उत्तम आरोग्य आणि जीवनशैलीबाबत जागरुकता निर्माण करणाऱ्या डॉक्टरांप्रति कृतज्ञता या निमित्ताने व्यक्त केली जाते. सनदी लेखापाल आर्थिक कार्यक्षमता आणि कायदेशीर नियमांचे पालन करण्याची क्षमता सातत्याने वाढवून देशाच्या आर्थिक विकासात योगदान देतात. त्यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी आजचा दिवस साजरा केला जातो.

**सीएएस**

जनरल धीरज सेठ यांनी काल 31 वे लष्करप्रमुख म्हणून पदभार स्वीकारला. मावळते लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी हे चार दशकांहून अधिक काळाच्या उल्लेखनीय सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. जनरल सेठ हे पुण्यातल्या राष्ट्रीय संरक्षण अकादमी म्हणजेच एनडीएचे माजी विद्यार्थी असून, डिसेंबर 1986 मध्ये ते लष्करात अधिकारी म्हणून रुजू झाले होते.

**इ-गवर्नन्स परिषद**

जयपूरमध्ये आजपासून 29 व्या राष्ट्रीय इ-गव्हर्नन्स परिषदेला सुरुवात होत आहे. दोन दिवसांच्या या परिषदचे विषयसूत्र विकसित भारत 2047-एआय, डेटा आधारित आणि सुरक्षित डिजीटल प्रशासन असे आहे. परिषदेच्या दुसऱ्या दिवशी इ-गव्हर्नन्स पुरस्कार दिले जाणार आहेत.

**अमेरिका-नागरिक**

अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने, जन्माच्या आधारे मिळणारे नागरिकत्व रद्द करण्याचा राष्ट्राध्यक्ष डोनल्ड ट्रम्प यांचा आदेश रद्द ठरवला आहे. यामुळे अमेरिकेत जन्मलेल्या जवळपास प्रत्येक व्यक्तीला आपोआप अमेरिकेचे नागरिकत्व देणाऱ्या या कायद्यावर शिक्कामोर्तब झालं आहे. ट्रम्प विरुद्ध बार्बरा या खटल्यात न्यायालयानं 6-3 अशा बहुमतानं हा कार्यकारी आदेश बेकायदेशीर ठरवला आहे. हा आदेश अमेरिकेच्या संविधानातील 14व्या घटनादुरुस्तीचे उल्लंघन करत असल्याचा निष्कर्ष सरन्यायाधीशांसह इतर चार न्यायाधीशांनी नोंदवला.

**स्थलांतर**

भारतानं 26 हून अधिक देशांशी स्थलांतर आणि गतिशीलता भागीदारी करारांवर स्वाक्षरी केली आहे. इतर देशांसोबत अनेक करारांवर सध्या वाटाघाटी सुरू आहेत. सुरक्षित, सुव्यवस्थित आणि कायदेशीर स्थलांतर सुनिश्चित करण्यासाठी द्विपक्षीय सहकार्याची गरज आहे असं मत परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉक्टर एस जयशंकर यांनी व्यक्त केलं. ते काल नवी दिल्लीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या मानव संसाधन मंचाच्या कार्यक्रमात बोलत होते.

**विधीमंडळ**

महाराष्ट्रात गुन्हेगारी आणि अमली पदार्थांच्या वितरणासाठी लहान मुलांचा वापर करणाऱ्यांविरोधात अधिक कठोर कारवाई करता यावी, यासाठी कायद्यात आवश्यक बदल करणार असल्याची माहिती महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत दिली. बाल गुन्हेगारांसाठीची वयोमर्यादा 18 वर्षांवरून 16 वर्ष करण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठवणार असल्याचंही फडणवीस यांनी सांगितलं.

**अमरनाथ यात्रा**

जम्मू आणि काश्मीरमध्ये अमरनाथ यात्रेसाठी सर्व आवश्यक तयारी पूर्ण करण्यात आली आहे. भाविकांची पहिली तुकडी उद्या भगवती नगर येथील बेस कॅम्प इथून रवाना होईल. नायब राज्यपाल आणि अमरनाथ श्राइन बोर्डाचे अध्यक्ष मनोज सिन्हा पहाटे 4 वाजता या पहिल्या तुकडीला हिरवा झेंडा दाखवून रवाना करतील. 57 दिवस चालणारी ही यात्रा पारंपरिक नुनवान-पहलगाम मार्ग आणि गांदरबल जिल्ह्यातील बालताल मार्गावरून सुरू होईल.

**इंधन निर्यात शुल्क**

पेट्रोल, डिझेल आणि विमानांसाठीच्या इंधनाच्या निर्यातीवर आजपासून सुरू होणाऱ्या पंधरवड्यासाठी निर्यात शुल्काच्या दरांमध्ये सुधारणा केली आहे. अर्थ मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसुचनेनुसार, पेट्रोलवर चार रुपये प्रति लीटर शुल्क आकारले जाईल. डिझेलवरील शुल्क 14 रुपयांहून कमी करून साडेआठ रुपये करण्यात आलं आहे. तर हवाई उड्डाणासाठीच्या इंधनाच्या निर्यातीवर विशेष अतिरिक्त उत्पादन शुल्क साडेसात रुपयांपर्यंत कमी करण्यात आलं आहे.

**सीमा शुल्क**

आखाती देशांतील संघर्षांमुळे, महत्त्वाच्या पेट्रोकेमिकल उत्पादनांवरील सीमा शुल्कांतील सवलत 15 जुलै पर्यंत वाढवली आहे. देशांतर्गत बाजारपेठेत पेट्रोकेमिकल्सची पुरेशी उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी ही सवलत देण्यात आली होती. सध्या परिस्थिती सामान्य होत आहे, मात्र या निर्णयामुळे संबंधित क्षेत्रासाठी सुरळीत कामकाज सुनिश्चित होणार आहे.

**विजया मेहता**

नाट्यसृष्टीतील दिग्गज व्यक्तिमत्व ज्येष्ठ दिग्दर्शिका विजया मेहता यांचं काल मुंबईत राहत्या घरी वृद्धापकाळाने निधन झालं. त्या 92 वर्षांच्या होत्या. प्रायोगिक मराठी रंगभूमीच्या प्रणेत्यांपैकी त्या एक होत. रंगायन या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी मराठी रंगभूमीला नवी दिशा, नवा दृष्टीकोन आणि जागतिक दर्जा मिळवून दिला. 'बॅरिस्टर', 'सखाराम बाईंडर', 'हमीदाबाईची कोठी', 'महानिर्वाण', 'पुरुष', 'हयवदन' आणि 'वाडा चिरेबंदी' ही त्यांची गाजलेली नाटके आहेत. त्यांना 'संगीत नाटक अकादमी पुरस्कारासह अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी गौरवण्यात आलं होतं.

**क्रिकेट**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळ म्हणजेच बीसीसीआयनं या वर्षाच्या शेवटी जपानमध्ये होणाऱ्या 2026 च्या आशियाई खेळांसाठी 15 सदस्यीय महिला संघाची घोषणा केली आहे.

**भारत-इंग्लंड क्रिकेट**

भारत आणि इंग्लंड दरम्यान होणाऱ्या पाच टी-ट्वेंटी क्रिकेट सामन्यांच्या मालिकेला आजपासून सुरुवात होत आहे. चेस्टर ली स्ट्रीट इथल्या रिव्हरसाइड ग्राउंड इथं पहिला सामना खेळला जाईल. भारतीय प्रमाण वेळेनुसार रात्री 10 वाजता सामना सुरू होईल. या मालिकेनंतर भारत इंग्लंडविरुद्ध तीन सामन्यांची एकदिवसीय मालिकाही खेळणार आहे.

**हवामान**

नैऋत्य मोसमी पावसाची देशभरात आगेकूच सुरू आहे. पुढील दोन दिवसांत दिल्ली, हरयाणा, चंदीगड आणि पंजाबमध्ये पुढे सरकण्याची शक्यता आहे. आज राज्यातील विविध भागात तसंच गोवा, कर्नाटक, केरळ, ओडिसामध्ये मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.